# पारनेर दर्शन

वर्ष १ अंक ३२४, मंगळवार १७ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये





### सुट्टीची सूचना

दि. १७ सप्टेंबर २०२४ रोजी गणेश विसर्जनानिमित्त ‘पारनेर दर्शन’ अंकास सुट्टी आहे. त्यामुळे १८ सप्टेंबरचा अंक प्रकाशित होणार नाही. याची जाहिरातदार, वाचक, एजंट यांनी नोंद घ्यावी

**सर्वांना गणेश विसर्जनाच्या हार्दिक शुभेच्छा!**

- संपादक

# सुनील थोरातांकडून विधानसभेची तयारी !

## लाडक्या बहिणींसाठी गणपती दर्शन । गणेशोत्सवाचे औचित्य



सुपा : प्रतिनिधी

**गणेशोत्सवाच्या औचित्यावर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे पारनेर तालुका अध्यक्ष सुनिल थोरात यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील सुमारे २५०० माता भागिनींसाठी ओझर व लेण्याद्री येथे अष्टविनायकांपैकी असणाऱ्या गणपतीचे मोफत दर्शन आयोजित केले होते.**

तालुक्यातील सहभागी माता भागिनींनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभाग घेऊन आनंद व्यक्त केला. यावेळी सहभागी असणाऱ्या सर्वच माता महिलांना भेट वस्तू म्हणून सुनिल थोरात यांनी तालुक्यातील भगिनींचा भाऊ म्हणून साडी भेट दिली आहे. यावेळी सर्व महिलांसाठी नाश्ता,जेवण याची उत्तम व्यवस्था सुनिल थोरात व मित्र परिवाराकडून करण्यात आली होती.

यात्रेचे प्रस्थान होताना भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, भाजपा महीला जिल्हाध्यक्ष अश्विनी थोरात, भाजपा तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, माजी तालुकाध्यक्ष वसंत चेडे, पारनेर तालुका भाजपा सरचिटणीस दिनेश बाबर,पारनेर तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक प्रसाद शितोळे,भाऊसाहेब मेचे,सुनिल पवार दत्ता रोकडे,भाजपा जेष्ठ नेते कृष्णाजी बडवे,युवा नेते तुषार पवार,भाजपा महिला तालुकाध्यक्ष सोनाली सालके, राष्ट्रवादी महिला तालुकाध्यक्ष सुषमा रावडे, शिवसेना महिला आघाडी अध्यक्ष मनिषा सोमवंशी , निर्मलाताई सुनिल थोरात, कीर्ती थोरात, अश्विनी रमेश थोरात, सुपा सरपंच मनीषा रोकडे, सरपंच मनोज मुंगसे, माजी सरपंच भाऊसाहेब डेरे, माजी उपसरपंच दत्तानाना पवार , मोहन खराडे ,भास्कर थोरात सर, अनिल दिवटे, भास्कर थोरात, ओंकार मावळे,भाऊसाहेब मांडगे, योगेश रोकडे, काशीनाथ नवले, गणेश पठारे, संतोष करपे यांसह सुनील थोरात मित्र परिवार व भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

### जिल्ह्यात प्रथमच महिलांसाठी साडी वाटप

**नगर जिल्ह्यात अनेक व्यक्तींकडून महिला देवदर्शनचे आयोजन यापूर्वी करण्यात आले होते परंतु कोणीही महिलांना साडी वाटप केले नाही प्रथमच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पारनेर तालुकाध्यक्ष सुनिल थोरात यांच्या माध्यमातून महिला साडी वाटप करण्यात आले याबद्दल महिलांकडून कौतुक करण्यात आले.**

सुनिल थोरात यावेळी बोलताना म्हणाले की, तालुक्यातून प्रथमच गणेशोत्सव काळात येवढ्या मोठ्या प्रमाणावर देवदर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आलेले असून यापुढे नवरात्रोत्सवामध्ये वणी येथील सप्तशृंगी देवीच्या दर्शनाला पारनेर-नगर मतदारसंघातील सर्वच महिलांना घेऊन जाणार असल्याचे थोरात यांनी जाहीर केले. तसेच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा अध्यक्ष म्हणून मला जी संधी मिळाली आहे त्याचा उपयोग सर्वच माता भगिनींच्या हितासाठी करणार असल्याचे ते यावेळी म्हणाले आणि महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपण कायमच प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

महिलांसाठी सुनिल थोरात यांनी राबविलेल्या यात्रेचे सर्वच उपस्थितांनी कौतुक करुन आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीकडून सुनिल थोरात यांनाच संधी मिळावी अशाही भावना उपस्थित महिलांनी व्यक्त केल्या. तसेच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी थोरात यांनी महिलांना कोणतीही अडचण येऊन दिली नाही आणि प्रत्येक गावगावात त्यांनी जाऊन महिलांना आलेल्या अडचणी सोडविण्यासाठी केलेल्या कष्टाची पावती महिलाभगिनी नक्कीच त्यांना विधानसभेत पाठवून देतील अशाही भावना काही महिलांनी व्यक्त केल्या.

### पालकमंत्री विखेंच्या शुभेच्छा

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सुनिल थोरात यांच्याशी फोनवरून संपर्क साधत यात्रेची काळजीपूर्वक चौकशी केली. कोणतीही अडचण येणार नाही याचीही त्यांनी काळजी घेण्याच्या सूचना केल्या तसेच सुनिल थोरात यांचे विखे पाटील यांनी कौतुक करत यात्रेत सहभागी महिलांशीही फोनवरुण संवाद साधला व थोरात यांच्या या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

### थोरात विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात ?

विधानसभा निवडणुकीचे पडघम पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात वाजायला सुरुवात झाली असून विविध पक्षांकडून अनेकजण तयारीला लागले असल्याचे दिसून येत असून विविध कार्यक्रमांद्वारे उमेदवारीसाठी इच्छुकांनी तसे संकेत दिले आहेत. यामध्ये आता सुनिल थोरात यांनीही उडी घेतली असून विधानसभा निवडणुक लढण्याची त्यांच्या मनातली इच्छा लपून राहिलेली नाही आणि त्यासाठी त्यांनी आपण सज्ज असल्याचे महिलांच्या मोफत गणपती देवदर्शन यात्रेतून दाखवून दिले आहे आणि यात्रेमध्ये तशी चर्चाही सुरु असल्याचे दिसून आले आहे.

### महायुतीमध्ये इच्छुक वाढणार !

पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातून निवडणुक लढविण्यासाठी महायुतीच्या सर्वच घटक पक्षातील इच्छुकांनी तयारी सुरु केली असून आता सुनिल थोरात यांनीही आपले मनसुबे जाहीर केले आहेत. यामुळे पक्षश्रेष्ठी नक्की कोणाला संधी देणार याकडे पुढील काळात मतदारसंघाचे लक्ष असणार आहे. तसेच आणखीन किती इच्छुक निवडणुकीसाठी रिंगणात उतरणार यावर पण निवडणुकीची गणिते अवलंबून असणार आहेत.

महिलांच्या यात्रेच्या माध्यमातुन सुनिल थोरात हे विधानसभा निवडणुकीत उतरले असल्याची चर्चा आता तालुक्यात होत असून महायुतीमधील अनेक इच्छुकांच्या शर्यतीत थोरात यांनीही उडी घेतल्याने आता महायुतीच्या नेतेमंडळींची नक्कीच डोकेदुखी वाढणार आहे. गणेश दर्शनाच्या माध्यमातुन विधानसभा दर्शनाचीच तयारी सुनिल थोरात यांनी केल्याचे बोलले जात असून निवडणुक प्रचाराचाच श्रीगणेशा थोरात यांनी सुरु केल्याचे यावेळी दिसून आले आहे.

# गोळीबार करणाऱ्या शितोळेकडून पतसंस्था चालकांना रिंगरोडचे आमिष!

■ दुप्पट लाभ मिळवून देण्याची दिली होती ■ ग्वाही पतसंस्था चालकांमध्ये खळबळ

पारनेर : प्रतिनिधी

**आर्थिक व्यवहारातून उरूळीकांचन जिल्हा पुणे येथे एका व्यक्तीवर गोळीबार करणाऱ्या दशरथ शितोळे याने पारनेर तालुक्यातील अनेक पतसंस्था चालकांना दुप्पट लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखविलेले आहे. शितोळे हा गोळीबाराच्या गुन्ह्यामध्ये अडकल्याने पैसे गुंतविलेल्या पतसंस्था चालकांचे धाबे दणाणले आहे.**




पुणे परिसरातून जाणाऱ्या प्रस्तावित रिंगरोडलगत जमिनींमध्ये पैसा गुंतविण्याचे आमीष दशरथ शितोळे याने दिल्यानंतर त्यास बळी पडून अनेक पतसंस्था चालकांनी या परिसरात पैसा गुंतविला. पुढे हा रिंगरोडचा प्रस्ताव रेंगाळल्याने पतसंस्था चालकांचा शितोळे याच्याकडे तगादा सुरू झाला होता.

जमिनींमध्ये पैसा गुंतविण्यासाठी पतसंस्था चालकांनी विनातारण कोट्यावधी रूपये पतसंस्थांमधून उचललेले आहेत. राजे शिवाजी पतसंस्थेकडून शितोळे यास सुमारे नउ कोटी रूपये विना तारण देण्यात आले असून त्यासंदर्भात चौकशी अधिकाऱ्यांनी शितोळे यास नोटीसही बजावलेली आहे. इतर पतसंस्थांच्या चालकांनीही शितोळे याच्यामार्फतच पैसे गुंतविले असून शितोळे याच्यावर गुन्हा दाखल झाल्याने आपल्या पैशांचे काय असा प्रश्न पतसंस्था चालकांपुढे आहे.


जमिनींमध्ये पैसा गुंतविल्याच्या कारणातूनच शितोळे याने पुण्यात गोळीबार केला. शितोळे याच्यामार्फत नेमक्या किती लोकांनी जमीनीमध्ये पैसा गुंतविला असावा याचा अंदाज आता पतसंस्थाचालक घेत आहेत.

# बिबटयाच्या हल्ल्यात सात शेळ्या मृत्यूमुखी

■ काही शेळ्या जखमी ■ गारगुंडी येथील प्रकार

गारगुंडी : प्रतिनिधी

**तालुक्यातील गारगुंडी येथील शेख वस्तीवर बिबट्याने केलेल्या हल्ल्यात सात शेळया मृत्यूमुखी पडल्या तर काही शेळया जखमी झाल्या आहेत. सोमवारी पहाटे ही घटना घडली. या परीसरात दोन ते तीन बिबटे असून त्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.**



गेल्या काही दिवसांपासून या परिसरात बिबट्याचे दर्शन घडत असून या बिबटयांनी शेळयांवर हल्ला केल्याने परिसरात भीतीचे वातावरण आहे. पठार भागातील म्हसोबा झाप येथे वन विभागाच्या वतीने तीन बिबट्यांना जेरबंद करून जंगलात सोडण्यात आले. गारगुंडी येथील बिबटयांनाही जेरंबद करून जंगलात सोडण्याची मागणी पुढे आली आहे.

गारगुंडीच्या शेख वस्तीवरील अमीन शेख यांच्या गोठयावर हल्ला करीत बिबटयांनी सात शेळयांचा फडशा पाडला. ही माहीती ग्रामस्थांना समजल्यानंतर त्यांनी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्याशी संपर्क करून माहीती दिल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करून या घटनेचा पंचनामा करून शेख यांना भरपाई देण्यात यावी अशा सुचना त्यांनी दिल्या. पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांशी संपर्क करून जखमी शेळयांवर उपचाराबाबतही पठारे यांनी सुचना दिल्या. पठारे यांच्या सुचननेनंतर वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देउन पंचनामा केला. हा अहवाल वरीष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मृत्यूमुखी पडलेल्या शेळयांची भरपाई मिळावी अशी मागणी डॉ. श्रीकांत पठारे, उपसरपंच प्रशांत झावरे, अक्षय फापाळे यांनी केली.

तालुक्याच्या पठार भागाच्या उत्तर भागात म्हसोबा झाप, वारणवाडी या परिसरात बिबटयांचा वावर मोठा आहे. वन विभाग त्यांना जेरबंद करण्यासाठी प्रयत्न करीत आहे.मात्र बिबट्यांची संख्या नियंत्रणात येत नसल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातारण आहे.

# महाराष्ट्रीयन जोडप्यांनी चेन्नईतही जपली गणेशोत्सवाची परंपरा; उत्साहात गणेशोत्सव साजरा

चेन्नई : संदीप पानमंद

**आपल्या महाराष्ट्रीयन पुरुष- महिला नोकरी व्यवसायानिमित्त देशात, परदेशात स्थिरस्थावर झालेले असताना आपले पारंपारिक सण, उत्सव, संस्कृती मोठ्या प्रमाणात जपताना आपण पाहतो. असाच एक उत्साहाचा सण म्हणजे गणेशोत्सव.**



या गणेशोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रीयन जोडप्यांनी चेन्नई येथे पारंपारिक पद्धतीने हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला. गोरेगाव (ता. पारनेर, जि. नगर) येथील इंजि. संदीप पानमंद व सौ. सुजाता संदीप पानमंद (कपाळे) यांनी महाराष्ट्रीयन जोडप्यांसह तेथील स्थानिक रहिवास्यांबरोबर मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी तसेच इतरही महिलांनी गणेशाची पुजा करून आपली भारतीय संस्कृती जपली आहे. त्याचबरोबर रक्षिता, जिनिशा, रिजूल, शाम्भवी, अयांशी आदी बालगोपाळांनीही या उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला.

# कोपरगावच्या पाच नंबर तळ्याचे श्रेय घेणाराला घरी बसवा

## उध्दव ठाकरेंचा शिवसैनिकांना सूचक आदेश



कोपरगाव : प्रतिनिधी

**कोपरगाव शहरासाठी नगरपालिकेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या १३१ कोटींच्या पाच नंबर तलावाचे श्रेय भलतेच लोक घेत आहेत. निवडणूक डोळ्यासमोर आल्यानंतर यांना आठवण झाली की कोपरगावच्या जनतेला पाणी दिले पाहिजे पण त्या पाच नंबर तळ्यासाठी निधी मी दिला होता.यांची जी काही थेर चालतात त्यांना आता घरी बसवा पाहिजे तर पेन्शन देऊन टाकू पण यांना घरी बसवा असा एल्गार माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी कोपरगाव दौऱ्यावर असताना जाहीर भाषणातून केला आहे.आमदार आशुतोष काळे यांचे नाव न घेता हा सूचक इशारा ठाकरे यांनी शिवसैनिकांना दिल्याने कोपरगावचे राजकीय समीकरण बदलून गेले आहे.**

जुनी पेन्शन योजेनासाठी महाधिवेशन प्रसंगी ठाकरे कोपरगाव येथील जनार्दन स्वामी आश्रम येथे आले होते.या वेळी झालेल्या जाहीर भाषणातून संदर्भ देताना स्थानिक उदाहरण म्हणून आज जलपूजन होते आहे असे समजले पण एवढे दिवस यांना जनता आठवली नाही आता निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन असेल थेर करत आहे पण त्या तलावासाठी निधी मी दिला होता असा घणाघात कोपरगावचे आमदार आशुतोष काळे यांच्यावर केला आहे.

अशोक काळे यांनी दहा वर्षे शिवसेनेतून विधानसभा मिळवली होती त्यासाठी शिवसैनिकांचे मोठे कष्ट होते.मात्र ठाकरे कुटुंबावर अपमानजनक टीका करून काळे यांनी शिवसेनेला सोडचिठ्ठी दिली होती.तेव्हा पासूनच शिवसैनिकांमध्ये प्रचंड रोष काळे यांच्याबद्दल आहे.कोपरगाव शहराचा पाणी प्रश्न चार दिवसाआड कधी आठ तर कधी एकवीस दिवसाआड होत आला आहे.जनतेला रोज स्वच्छ पाणी मिळावे यासाठी उध्दव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना शिवसैनिकांचे मत जाणून घेऊन पाच नंबर तळ्यासाठी भरीव निधी दिला.मात्र आमदार असल्याने काळे यांनी नगरपालिकेसाठी मंजूर असलेल्या तलावाचे श्रेय घेण्यास सुरुवात केल्याने नागरीकांना ते खटकले त्यावर थेट ठाकरे यांनी भाष्य केल्याने आमदार आशुतोष काळे यांना राजकीय दणका मिळाला असल्याची एकच चर्चा सभास्थळी सुरू झाली होती.







# चंदेरी

## उर्फी जावेद करणार बॉलिवूडमध्ये पदार्पण!

राजकुमार राव, नुशरत भरुचा यांचा 'लव्ह सेक्स और धोका' हा चित्रपट चांगलाच



गाजला. नव्या पिढीच्या प्रेमाची एक विचित्र व्याख्या अन् त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या यावर बेतलेला हा चित्रपट प्रेक्षकांना प्रचंड आवडला. आता याच्या सीक्वेलची म्हणजेच 'लव्ह सेक्स और धोखा २' ची चर्चा सोशल मीडियावर पाहायला मिळत आहे. या सीक्वलमध्ये इंटरनेटच्या विश्वात प्रेम आणि नातेसंबंध यावर भाष्य करण्यात येणार असल्याचं सांगितलं जात आहे. या चित्रपटाबाबत एक नवीन अपडेट समोर आली आहे ती म्हणजे या चित्रपटातून इंटरनेट सेन्सेशन उर्फी जावेद मोठ्या पडद्यावर पदार्पण करताना दिसणार आहे.

आपल्या चित्रविचित्र फॅशनमुळे कायम लाईमलाइटमध्ये असणारी उर्फी या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार असल्याची चर्चा आहे. उर्फी तिच्या पेहरावामुळे कायम चर्चेत असते. तिच्यावर प्रचंड टीकादेखील होते, परंतु ती अतिशय बेधडकपणे या सगळ्याचा सामना करून तिला जे हवं आहे तेच ती करते. 'बिग बॉस ओटीटी'मुळे अधिक लोकप्रिय झालेल्या उर्फीने याआधीही अभिनयात नशीब आजमावलं आहे. टेलिव्हिजनवरील बऱ्याच मालिकांमध्ये उर्फी एका आदर्श सुनेच्या भूमिकेतून प्रेक्षकांसमोर आली आहे. 'लव्ह सेक्स और धोका २' या चित्रपटाचे कथानक हे उर्फीच्या व्यक्तिमत्त्वाशी मिळते जुळते असल्याचं स्पष्ट होत आहे. एकता कपूरची प्रोडक्शन कंपनी बालाजी टेलीफिल्म्स याची निर्मिती करणार आहे. याआधी या चित्रपटात तुषार कपूर आणि मौनी रॉय हे दोघे झळकणार होते, पण या दोघांनी यासाठी नकार दिल्याचं सांगितलं जात आहे. इतकंच नव्हे तर हा चित्रपट १९ एप्रिल २०२४ रोजी प्रदर्शित होणार असल्याचीही शक्यता वर्तवली जात आहे. उर्फी जावेद याआधी 'ए मेरे हमसफर', 'चंद्र नंदिनी', 'मेरी दुर्गा', 'साथ फेरो की हेरा फेरी', 'बेपना', 'डायन'सारख्या अनेक टेलिव्हिजन मालिकांमध्ये दिसली आहे. याबरोबरच तिने 'रिश्ता क्या कहलाता है', 'बडे भैया'सारख्या मालिकांमध्येही काम केलं आहे. आजकाल उर्फी केवळ पापाराझींसमोरच्या तिच्या चित्र-विचित्र आणि ग्लॅमरस फॅशनसाठी ओळखली जाते.

## कधीकाळी तीन अफेअर अन् आज एकटीच राहतेय अभिनेत्री नगमा!

कौटुंबिक पार्श्वभूमी अभिनय क्षेत्रातली नसूनही बॉलीवूडमध्ये अनेक अभिनेत्रींनी आपल्या कामाच्या जोरावर स्थान निर्माण केलं. आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलं आणि सुपरहिट चित्रपट दिले. अशीच एक अभिनेत्री आहे, जिने करिअरमध्ये सुपरहिट सिनेमे दिले, आघाडीच्या कलाकारांबरोबर काम केलं, केवळ हिंदीच नव्हे तर दाक्षिणात्य व भोजपुरी इंडस्ट्रीतही अभिनयाची जादू दाखवली. वैयक्तिक आयुष्यामुळेही प्रकाशझोतात राहिली. या अभिनेत्रीचं नाव नगमा आहे.

नगमा बॉलिवूडमधील सुंदर अभिनेत्रींपैकी एक आहे, तिने आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. नगमाने हिंदी चित्रपटांमध्ये सलमान खान आणि शाहरुख खान सारख्या स्टार्ससह काम केलं. मग तिने दाक्षिणात्य सिनेसृष्टीत रजनीकांत यांच्यासह अनेक कलाकारांबरोबर चित्रपट केले. त्यानंतर ती भोजपुरी चित्रपटांकडे वळली. तिने तिच्या करिअरमध्ये एकूण ८१ चित्रपट केले. चित्रपटांसोबत वैयक्तिक आयुष्यामुळेही ती खूप चर्चेत राहिली. एकेकाळी नगमा तिच्या अफेअरच्या बातम्यांमुळे खूप चर्चेत होती. तिचं नाव भारतीय क्रिकेट संघाचा तत्कालीन कर्णधार सौरव गांगुलीबरोबर जोडलं गेलं होतं. या बातम्या आल्या तेव्हा सौरव विवाहित होते, पण नगमा किंवा सौरवने याबाबत कधीच प्रतिक्रिया दिली नाही.

यानंतर नगमा भोजपुरी चित्रपटांकडे वळली. इथं तिने मनोज तिवारी आणि रविकिशन यांच्याबरोबर काम केलं. त्यांची जोडी हिट ठरली आणि नगमाचं नाव या दोन्ही स्टार्सशी जोडलं जाऊ लागलं. खरंतर हे दोन्ही स्टार्स विवाहित होते. मनोज तिवारींनी या प्रकरणी मौन बाळगलं, पण रविकिशन यांनी याबद्दल प्रतिक्रिया दिली होती. आपल्याला नगमा खूप आवडते पण मी विवाहित आहे, असं रवीकिशन म्हणाले होते. याशिवाय नगमाचं नाव सरथ कुमार नावाच्या व्यक्तीशीही जोडलं गेलं होतं, पण हे नातंही टिकू शकलं नाही. काही काळानंतर नगमाने चित्रपटसृष्टी सोडली आणि ती राजकारणात गेली. आता ती काँग्रेस पक्षाची सदस्य असून अनेक वर्षांपासून राजकारणात सक्रिय आहे. ४९ वर्षीय नगमा अजूनही अविवाहित आहे, तिने लग्न केलेलं नाही.



## लव्हस्टोरी अरबाज अन् शुराची...

**अरबाज खान आणि शुरा खान यांनी मित्रपरिवाराच्या उपस्थितीत लग्नगाठ बांधली. अरबाजच्या चाहत्यांना याचा सुखद धक्का बसला, कारण तोपर्यंत या कपलने त्यांच्या नात्याचा कुठेही खुलासा केला नव्हता. अरबाजने सांगितलं की, लग्नाआधी शुरा आणि तो एक वर्षापासून एकमेकांना डेट करत होते. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत अरबाजने त्याची आणि शुराची पहिली भेट कशी झाली, याबद्दल खुलासा केला आहे...**



अरबाज म्हणाला की, त्याने निर्मित केलेल्या 'पटना शुक्ला' चित्रपटाच्या सेटवर तो पहिल्यांदा शुराला भेटला. या चित्रपटात रवीना टंडन प्रमुख भूमिकेत होती आणि शुरा रवीनाची मेकअप आर्टिस्ट होती. अरबाजने सांगितलं की, शुरा रवीनाबरोबर सात ते आठ वर्षांपासून काम करत होती. 'पटना शुक्ला'च्याआधी अरबाज कधीच शुराला भेटला नव्हता किंवा तिच्याबद्दल कधी ऐकलं नव्हतं. अरबाज म्हणाला की, त्यांची लव्ह स्टोरी सेटवर भेटल्यानंतरसुद्धा खूप वेळानंतर सुरू झाली. सेटवरचा त्यांचा संवाद खूप मर्यादित होता. रवीनाची केसं नीट कर किंवा हॅलो, हाय वगैरे असे संवाद दोघांमध्ये व्हायचे. शूट संपल्यानंतर दोघं काही मीटिंग्समध्ये आणि पार्टीजमध्ये भेटले होते. त्यानंतर त्यांची ओळख वाढली. लोकांना कळण्याआधीच ते एक वर्ष एकमेकांना डेट करत होते. आम्ही स्वतःला खूप नशीबवान समजतो, कारण आम्ही एकमेकांना कॉफी शॉप्समध्ये भेटत होतो. मी तिला घरी सोडायलापण जायचो, तरीही आम्हाला मीडिया, पापाराझी किंवा कोणीही स्पॉट केलं नाही. दरम्यान, अरबाजच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल सांगायचं झालं, तर १९ वर्षांच्या संसारानंतर २०१७ रोजी अरबाज खान आणि अभिनेत्री मलायका अरोरा यांनी घटस्फोट घेतला. त्यानंतर अरबाज अभिनेत्री जॉर्जिया एंड्रियानीला डेट करत होता. अरबाजने एका मुलाखतीत सांगितलं होतं की, शुराला भेटण्याआधी दोन वर्षांपूर्वी जॉर्जिया एंड्रियानी आणि त्याचं ब्रेकअप झालं होतं.

## गरोदरपणामुळे दिला होता नेहाला डच्चू..!

**नेहा धुपिया बॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आतापर्यंत तिने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. सध्या नेहा चित्रपटात झळकत नसली तरी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. निरनिराळे फोटो व व्हिडीओ पोस्ट करत ती चाहत्यांना अपडेट देत असते. चित्रपटानंतर आता नुकतेच नेहाने ओटीटीवरही पदार्पण केले आहे. नुकताच तिचा ओटीटीवर 'नो फिल्टर नेहा'चा दुसरा सीझन प्रदर्शित झाला. या कार्यक्रमातून ती बॉलीवूडमधील अनेक कलाकारांच्या मुलाखती घेते.**




चित्रपटातून ब्रेक घेतल्यावर वाढलेले वजन अन् गरोदर राहिल्याने झालेले बदल यामुळे नेहाला चित्रपटसृष्टीत पुन्हा कमबॅक करताना आलेले अनुभव तिने नुकतेच एका मुलाखतीदरम्यान शेअर केले आहेत. 'झुम'शी संवाद साधताना नेहा म्हणाली, की मी जेव्हा या चित्रपटसृष्टीत आले तेव्हा महिला कलाकारांना एका ठराविक साच्यातल्याच भूमिका मिळायच्या. जर तुम्ही त्या साच्यात फिट बसत नसाल तर तुम्ही यासाठी योग्य नाही असं सरसकट ठरवलं जायचं. आता चित्र फार वेगळं आहे, कास्टिंगदेखील अगदी चपखल होतं, पण मला बऱ्याचदा कामावरून काढून टाकण्यात आलं आहे. माझा चेहरा आणि वजन कमी करण्यासाठी मी दिलेला नकार यामुळे मलाही बऱ्याचदा नकार पचवावा लागला आहे, असे ती म्हणाली. नेहा म्हणाली, की मी जेव्हा गरोदर होते तेव्हा एका कार्यक्रमातून मला काढून टाकण्यात आलं होतं अन् त्यानंतर तब्बल ८ महिने त्यांनी तो कार्यक्रम माझ्याशिवाय शूट केला. ते म्हणाले, की त्यांना माझ्याबरोबर काम करायचंच नाहीये. त्यामुळेच त्यांनी हा निर्णय घेतला. असे बरेच प्रकार माझ्याबाबतीत घडले आहेत, पण आता मात्र या गोष्टींचा माझ्यावर फार परिणाम होत नाही, असेही तिने सांगितले. नेहाच्या कामाबद्दल बोलायचे तर, ती शेवटची २०२२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'ए थर्सडे'मध्ये दिसली होती. या चित्रपटात नेहाबरोबर यामी गौतमची मुख्य भूमिका होती. यामध्ये नेहाने पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारली होती. तसेच नेहाचा 'रोडीज' शोसुद्धा खूप गाजला होता. आता लवकरच नेहा अभिनेता गुलशन देवैयासह 'थेरपी शेरपी' या नव्या वेबसीरिजमध्ये झळकणार आहे.

## रकुलला आवडत नाही जॅकीची 'ही' सवय

बॉलीवूड अभिनेता जॅकी भगनानी व अभिनेत्री रकुल प्रीत सिंग २१ फेब्रुवारीला लग्नबंधनात अडकले. गोव्यात त्यांच्या शाही लग्नसोहळ्याची तयारी करण्यात आली होती. कुटुंबीय व जवळच्या मित्र-मैत्रिणींच्या उपस्थितीत हा लग्नसोहळा पार पडला. जॅकी व रकुलच्या लग्नाला बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी हजेरी लावली होती.


लग्नानंतर पहिल्यांदाच रकुलने डीएनए वुमन अचिव्हर्स अवॉर्ड्स कार्यक्रमात हजेरी लावली होती. या कार्यक्रमात दिलेल्या मुलाखतीमध्ये तिने जॅकीबाबत अनेक खुलासे केले आहेत. तसेच जॅकी आणि तिच्या वडिलांच्या पहिल्या भेटीबद्दल किस्साही तिने सांगितला. रकुलचे



वडील भारतीय लष्कराचे निवृत्त अधिकारी आहेत. जॅकी व तिच्या वडिलांसोबतच्या पहिल्या भेटीबद्दल बोलताना ती म्हणाली, माझे वडील फार कडक नाहीत, पण त्यांना शिस्त आवडते. जेव्हा जॅकी व माझे वडील पहिल्यांदा भेटणार होते, तेव्हा मलाच जास्त काळजी वाटत होती. जेव्हा ते जॅकीला भेटले तेव्हा त्यांनी थेट जॅकीचीच चौकशी सुरू केली. मात्र, जॅकी यासाठी आधीच तयार होता, असे रकूलने सांगितले. या मुलाखतीत तुला जॅकीची कोणती सवय आवडत नाही, असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाला उत्तर देत ती म्हणाली, जॅकी वक्तशीर नाही, तो वेळ पाळत नाही, पण मी खूप वक्तशीर आहे. मला ही सवय माझ्या वडिलांकडून लागली. सुरुवातीला जेव्हा जॅकी पाच मिनिटांत येतो म्हणायचा तेव्हा तो तासभर लावायचा. मात्र, आता त्याच्यात सुधारणा झाली आहे. आता त्याचे पाच मिनिटं म्हणजे २० मिनिटं असतात. रकुलच्या वर्कफ्रंटबाबत बोलायचे झाल्यास, गेल्या वर्षी तिचा 'छत्रीवाली' चित्रपट प्रदर्शित झाला. तसेच काही दिवसांपूर्वी ती 'आयलन' या चित्रपटात झळकली होती. मात्र, बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट फ्लॉप ठरला. आता लवकरच ती 'इंडियन २' आणि 'रामायण' या चित्रपटांमध्ये दिसणार आहे.

## सिद्धार्थमध्ये लग्नानंतर आली ही शक्ती!


मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय जोडींपैकी एक म्हणजे सिद्धार्थ चांदेकर व मिताली मयेकर. मराठीतील हे क्यूट कपल नेहमी चर्चेत असतं. २४ जानेवारी २०२१ साली दोघांनी लग्नगाठ बांधली होती. मोठ्या थाटामाटात सिद्धार्थ व मितालीचा लग्नसोहळा पार पडला होता. पण लग्नाच्या तीन वर्षांनंतर सिद्धार्थमध्ये काय बदल झाले, जाणून घ्या...



सिद्धार्थ नुकताच एका कार्यक्रमात सहभागी झाला होता. तेव्हा त्याला विचारण्यात आलं की, लग्नानंतर तुझ्यात काय बदल झाले? यावर तो म्हणाला, की माझ्या कपाटाच्या साइजमध्ये खूप बदल घडलेला आहे. तसंच मी आधी सतत काळजी, चिंता करणारा माणूस होतो. आता ते माझं सतत चिंता करण्याचं प्रमाण कमी झालंय. शांतता आली असं वाटतंय. याशिवाय मी माझ्या लग्नानंतर कामाकडे जास्त लक्ष देऊ लागलो. मिताली माझ्या करिअरसाठी अत्यंत लकी ठरली, असे तो म्हणाला. आता माझ्या करिअरची गाडी धावतेय. मला आता ती थांबेल किंवा बिघडेल या गोष्टींची भीती नाहीये. महत्त्वाचं म्हणजे लग्नानंतर मला अपयशी होण्याची भीतीच वाटतं नाही. कधी ना कधीतरी अपयश येणारच आहे. मात्र अपयश येऊ नये यासाठी माझे हात आताच थरथरत नाहीयेत. मला अपयश आलं तर तेव्हा जे काही दुःख होईल, त्रास होईल या सगळ्याला मी सामोर जाऊ शकतो. मी खूप हसत-खेळत असं नाही म्हणणार. पण मी सामोर जाऊन पुन्हा कमबॅक करेन. लग्नानंतर ही माझ्यात शक्ती आली आहे, असं सिद्धार्थ म्हणाला.

## हैराण व्हाल... ॲटली कुमारला मिळणार 'इतके' मानधन!

'झुकेगा नहीं' म्हणत बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणारा 'पुष्पा' म्हणजेच अल्लू अर्जुन हा सध्या चांगलाच चर्चेत आहे. कोविड काळात या चित्रपटाचा पहिला भाग आला होता ज्याला प्रेक्षकांनी अतिशय उत्तम प्रतिसाद दिला. आता अल्लू अर्जुन, रश्मिका मंदान्ना आणि फहाद फासिल यांच्या बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित 'पुष्पा २' या चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट बघत आहेत. हा चित्रपट यावर्षी ऑगस्ट महिन्यात रिलीज होण्यासाठी सज्ज आहे.



अल्लू अर्जुन लवकरच 'जवान'चा दिग्दर्शक ॲटलीच्या आगामी चित्रपटातही झळकणार आहे. 'जवान'च्या जबरदस्त यशानंतर आता ॲटली त्याचा पुढचा चित्रपट अल्लू अर्जुनबरोबर करणार असल्याची चर्चा आहे. सध्या या चित्रपटाची तयारी जोरदार सुरू आहे. नुकतंच याबद्दल एक नवी अपडेट समोर आली आहे. मीडिया रिपोर्टनुसार अल्लू अर्जुनबरोबरच्या या चित्रपटासाठी ॲटलीने चांगलेच मानधन आकारले आहे. समोर आलेल्या माहितीनुसार या चित्रपटासाठी ॲटली कुमारला तब्बल ६० कोटींचे मानधन देण्यात येणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आजवर कोणत्याही दिग्दर्शकाला एवढी मोठी रक्कम मानधन म्हणून कधीच दिलेली नव्हती. परंतु ॲटली कुमारच्या आधीच्या चित्रपटांचे कलेक्शन पाहता त्याला एवढी रक्कम देणं योग्य असल्याचंही सांगण्यात येत आहे. अद्याप याबद्दल कोणीही अधिकृत भाष्य केलेलं नाही. जर हे वृत्त खरं असेल तर ॲटली कुमार हा सर्वात महागडा दिग्दर्शक बनू शकतो, असं सांगण्यात येत आहे. अल्लू अर्जुन आणि ॲटली कुमारच्या या चित्रपटाचं प्री-प्रोडक्शनचं काम सुरू आहे. लवकरच अल्लू अर्जुन या चित्रपटाची घोषणा करू शकतो असंही सांगितलं जात आहे. ॲटलीने नुकतंच शाहरुख खानबरोबर 'जवान'सारखा चित्रपट देऊन बॉक्स ऑफिसवर एक वेगळाच इतिहास रचला. त्यामुळे प्रेक्षक त्याच्या आगामी प्रोजेक्टची आतुरतेने वाट बघत आहेत.

## शाहरुख, रणवीरला जन्नतने टाकले मागे!

लहानपणी मनोरंजनसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या अनेक अभिनेत्री आहेत. त्या अभिनेत्रींनी पुनरागमन करत इंडस्ट्रीमध्ये आपली नवी ओळखही निर्माण केली आहे. आलिया भट्टपासून ते श्रीदेवीपर्यंत अनेक अभिनेत्रींनी लहान वयातच आपल्या करिअरची सुरुवात केली. जन्नत जुबैर हे त्यातलंच एक नाव आहे.

जन्नतने वयाच्या सातव्या वर्षी 'चांद के पार चलो' या मालिकेतून इंडस्ट्रीमध्ये पदार्पण केलं. 'काशी- अब ना रहें तेरा कागज कोरा' आणि 'फुलवा' या मालिकांमुळे प्रसिद्धी मिळाली. 'लव्ह का दि एंड' या चित्रपटात जन्नतने श्रद्धा कपूरच्या लहान बहिणीची भूमिका साकारली होती. यामुळे तिला लोकप्रियता मिळाली. जन्नत सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असते व तिला लाखो करोडो चाहते फॉलो करतात. फॉलोअर्सच्या स्पर्धेत जन्नतने सुपरस्टार शाहरुख खानलासुद्धा मागे टाकलं आहे. जन्नतच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर ४९.२ मिलियन फॉलोअर्स आहेत, तर शाहरुख खानचे ४६.६ मिलियन फॉलोअर्स आहेत. या गोष्टीत जन्नतने करिना आणि सारा अली खानलासुद्धा मागे टाकलय. साराचे इन्स्टाग्राम अकाउंटवर ४५ मिलियन फॉलोअर्स आहेत, तर करिना कपूरचे १२ मिलियन फॉलोअर्स आहेत. जन्नतची नेटवर्थ २५ कोटी आहे अशी चर्चा आहे. जन्नत महिन्याला २५ लाखांपर्यंत कमावते. महितीनुसार, 'खतरों के खिलाडी'मधली सर्वात जास्त मानधन घेणारी स्पर्धक जन्नत होती. एका एपिसोडसाठी जन्नत १८ लाख रुपये मानधन घेत होती. दरम्यान, जन्नतने वयाच्या २१ व्या वर्षी मुंबईत स्वकमाईने घर घेतलं. जन्नत इन्स्टाग्रामबरोबरच युट्यूबवरसुद्धा सक्रिय असते. तिची ओळख कन्टेन्ट क्रिएटर अशीही असल्याने ती निरनिराळे फोटोज आणि व्हिडीओज आपल्या चाहत्यांसह शेअर करत असते.



## शॉर्ट न्यूज

### पाणी प्रश्न सोडविल्याचा अभिमान

**कोपरगाव :** शहराचा पाणीप्रश्न किती गंभीर होता, याची दाहकता मी अनुभवली आहे. याच पाणी प्रश्नाचा संघर्ष माझ्या कार्यकाळात मीदेखील केला आहे. त्यावेळी प्रामाणिक प्रयत्न माझेदेखील होते; परंतु त्यावेळी सत्ताधारी पक्षाचा आमदार नसल्यामुळे अपेक्षित यश आले नाही. मात्र, ज्या प्रश्नाला मी हात घातला तोच प्रश्न आशुतोषने ५ नंबर साठवण तलावाच्या माध्यमातून सोडविला, याचा अभिमान असल्याचे मत माजी आमदार अशोकराव काळे यांनी व्यक्त केले.

### मनोज जरांगेंची लवकरच घोंगडी बैठक

**नेवासा :** तालुक्यात लवकरच मराठा आरक्षणाचा लढा तीव्र करणारे मनोज जरांगे यांच्या घोंगडी बैठकीचे आयोजन करण्यात आले असून, नेवासा तालुक्यातील मराठा समन्वयकानी दिलेले निमंत्रण जरांगे पाटील यांनी स्वीकारल्याचे सुरेश पाटील शेटे यांनी स्पष्ट केले. मराठा आरक्षणासाठी अविरत लढा देणारे मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे यांनी सध्या महाराष्ट्रभर दौरे करत घोंगडी बैठका घेण्याचा सपाटा लावला आहे. याची धडकी राज्य सरकार व इतर पक्षांनाही भरली आहे. मतदार संघात मराठा बांधावाकडून जरांगे पाटील यांच्या या घोंगडी बैठकांचे आयोजन केले जात आहे.

### एसटी बस सेवा सुरु करण्याची मागणी

**पाथर्डी :** आगारातून सकाळी बीडसाठी सुटणारी एसटी बस सेवा बंद केल्याने प्रवाशांचे हाल होत असून ही गाडी पुन्हा सुरू करावी, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. पाथर्डीहून सकाळी शिरूर कासारमार्गे बीडला जाणारी बस बंद झाल्याने प्रवाशाचे प्रचंड हाल होत आहेत. खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या दरात कमालीची वाढ झाली आहे. ३० वर्षांपासून सुरू असणारी एसटी अचानकबंद झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. पाथर्डी ते बीड दरम्यान अनेक प्रवासी या एसटीचा वापर करून प्रवास करत होते.

### एचआयव्ही विषयी जनजागृती गरजेचे

**संगमनेर :** एचआयव्हीविषयी जनजागृती करणे गरजेचे आहे, असे आरोग्य अधिकारी सुचित्रा पवार म्हणाल्या. शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लबद्वारे एचआयव्हीचे विषयी जागरुकता वाढविणे, या विषयावर आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी दत्तात्रय म्हस्के, कार्यालयीन अधीक्षक सचिन वालझाडे उपस्थित होते. म्हस्के यांनी विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्त्व सांगून रक्तदान करण्यासाठी प्रोत्साहित केले. प्रास्ताविक प्रा. रामदास सोन्नर यांनी केले.

### अडीच वर्षीय बाळाचे अपहरण करून हत्या

**श्रीरामपूर :** जावयाने सासुरवाडीतून मेहुण्याच्या अडीच वर्षीय बाळाचे अपहरण केले. त्यानंतर बाळाची हत्या करून मक्याच्या पिकात फेकून दिल्याची घटना समोर आली आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, राहुल बोधक असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे, तर स्नेहदीप असे हत्या झालेल्या बाळाचे नाव आहे. आरोपी राहुल बोधक हा वैजापूर तालुक्यात रहिवासी आहे. सततच्या भांडणामुळे त्याची पत्नी श्रीरामपूर तालुक्यातील नायगाव येथे माहेरी निघून आली होती. ती परत नांदायला जात नसल्याने आरोपी रागातच आठ दिवसांपूर्वी सासुरवाडीत आला.

# स्व.दादाभाऊ मोरे : सत्कर्मी व्यक्तीमत्व



आमचे घरातील व कुटुंबातील सर्वच अर्थाने अतिउच्च शिखरावर अथक प्रयत्नाने, सर्व अर्थाने यशस्वी होऊन, सर्वांच्या पाठीमागे उभे राहून, सदैव आशीर्वादाची थाप देणारे अतिउच्च व्यक्तिमत्व म्हणजेच आमचे दाजी कै. दादाभाऊ नामदेव मोरे. वयोपरत्वे त्यांचे दुःखद निधन झाले.त्यांना श्रद्धांजली अर्पण करताना त्यांचा संपूर्ण जीवनपट व त्यांनी आयुष्यभर स्वतःच्या कुटुंबाकरिता केलेले सत्कर्म, समाजकारण व नातलगांच्या हिताकरिता जगलेला इतिहास डोळ्यांसमोर उभा राहिला.

आमची मोठी बहीण कै. पारुबाई / भामाबाई हिच्या बरोबर विवाह झाल्यानंतर आमचे दाजी त्याकाळी इ. ७ वी पर्यंत शिकलेले होते, तत्कालीन परिस्थितीमध्ये प्राथमिक शिक्षक, तलाठी, अशी नोकरी मिळणे सहज शक्य होते, परंतु स्वतःच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती व काळ्या आईची सेवा व कष्ट करून सोने पिकवण्याचे व त्यातूनच कुटुंबाची सर्व अर्थाने प्रगती / उत्कर्ष करावयाचा ही जिद्द त्यांनी मनाशी बांधली होती, माझी बहीण व दाजी यांच्या एकत्रित सहजीवनाच्या पुण्याईमुळे त्यांना विद्वान, कर्तव्यदक्ष व शीलवान २ मुले व 3 मुली त्यांचे पोटी जन्मास आल्या, मुलेमुली खूप कर्तृत्ववान आहेत.

आमच्या कुटुंबातील आदर्श मुलगा देवराम याने महाराष्ट्र शासनामध्ये सहाय्यक अभियंता म्हणून काम पहिले, धाकटा मुलगा श्री. पोपट याने एम.कॉमपर्यंत शिक्षण घेतले. पुणे येथे व्यवसाय निमित्ताने ते स्थायिक झाले. आमचीच मुलगी सौ. सविता त्यांना पत्नी म्हणून देवून जुन्या नात्यास नवीन नातेसंबंध जोडण्याचा यशस्वी प्रयत्न दोन्ही कुटुंबांनी केला. आज दोनही मुलांनी आपले मुलांना अभियंते केले असून मुले, मुली, नातवंड, परतवंडं मोठ्या आनंदाने गोकुळासारखे एकत्र कुटुंबात राहत आहेत. कोणत्याही स्वरूपाचा कलह / वाद नाही, जे मिळेल त्यात आनंद मानणारे सदरचे कुटुंबास यशस्वी करण्यात आमचे दाजींचेच महत्वाचे योगदान / प्रयत्न आहेत. मोठा मुलगा अभियंता झाला, सरकारी नोकरी मिळाली, प्रसंगी त्यांनी वेळोवेळी आम्हास व प्रा. सिताराम निघूट यांना माझे धाकटे मुलास तुम्ही नोकरी मिळवून देत नाहीत अशा स्वरूपाची अपेक्षा ते नेहमी करत होते परंतु त्यांच्या धाकट्या मुलाने सुद्धा कॉमर्स पदवीधर असूनसुद्धा आपले वडिलोपार्जित शेतीत सोने पिकवण्याचा आटोकाट प्रयत्न केला व त्यात ते यशस्वी झालेले आहेत, यासही व याकामी आमचे दाजींची व बहिणीची पुण्याई कामी आली. उच्च सुशिक्षित मुलगासुद्धा शेतीवाडी करून आपले आईवडिलांचा वारसा यशस्वीरीत्या पुढे चालवीत आहेत, अशा गुणी मुलांचा व मुलींचा आम्हास सार्थ अभिमान आहे, शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी याचीही खात्री पटते.

आमचे दादाभाऊदाजींचा नातलगांना सर्व अर्थाने व सर्व प्रकारे मदत, सहकार्य व मार्गदर्शन करण्यामध्ये सिंहाचा वाट असायचा. आपल्या तीनही विवाहित बहिणींच्या मुलांची व कुटुंबीयांची सर्व अर्थाने काळजी व प्रगतीत त्यांचा सिंहाचा वाटा होता. माझे कुटुंबीयांसही त्यांनी सर्व अर्थाने वेळी व प्रसंगी आर्थिक मदतसुद्धा केलेली आहे. आम्ही गावी घर बांधताना, घराभोवतीची बाग करताना, प्रसंगी बोअरवेलचे पाणीपूजन करताना आम्ही त्यांचा आशीर्वाद / मार्गदर्शन घेतल्याशिवाय कधीही पुढचे पाऊल टाकले नाही. निस्वार्थी भावाने आम्हांस व इतर सर्व नातलगांस मदत व मार्गदर्शन करण्यामध्ये ते सतत पुढे असायचे. माझ्या आयुष्याच्या जडणघडणीमध्ये त्यांचे लाखमोलाचे मार्गदर्शन मला व माझे कुटुंबियांना झाले आहे.

माझे दाजींमध्ये मला नेहमी दिव्यत्व दिसत असे. कोणाला दोष देण्याऐवजी किंवा कोणते आरोप कोणावरही करण्याऐवजी त्यांचे चांगले गुण घेऊन सकारात्मक प्रयत्न करणे, त्याकामी वेळप्रसंगी पंचांगसुद्धा ते पाहत असे. आमच्या बहिणीचा सौभाग्यलेणे घेऊन जून २०१८ मध्ये मृत्यू झाल्यानंतर ते थोडेसे खचले होते, परंतु त्यांची मुले भाऊसाहेब, पोपट मुली सौ. हौसाबाई, सौ. कमळाबाई व सौ चंद्रभागा यांचे सर्वांचे प्रेमामुळे व प्रयत्नामुळे पत्नीच्या मृत्यूनंतरसुद्धा त्यांना ६ वर्षाचे आयुष्य मिळाले. ते मुळातच सडपातळ, निरोगी व सतत आनंदी राहणारे व्यक्तिमत्व होते. म्हणूनच त्यांनी वयाची ९२ वर्षे यशस्वीरीत्या पूर्ण केलेली आहेत. आयुष्याच्या अंतिम काळामध्ये वयाची नव्वदी उलटल्यानंतर मुलाने त्यांना काशी, गंगा इ. तीर्थस्थळे दाखवून आणल्यानंतर त्यांना वृध्दत्वाचा व त्यातून येणाऱ्या दुखण्यांचा त्रासही सहन करावा लागला, परंतु त्यांच्या दोनही सुसंस्कारी सुना सौ. मंदा व सौ. सविता व मुली यांनी त्यांची सर्वकाही सेवा व सुश्रुषा केली ती मी डोळ्यांनी अनेकवेळा पाहिली आहे, अशी सुसंस्कृत मुले व मुली जन्माला येणे व त्यांचे हातून सत्कर्म होणे यांस आमचे दाजींची व बहिणीची पुण्याई कामी आली व त्यांचे जीवन खऱ्या अर्थाने परिपूर्ण व यशस्वी झाले व त्या कामाचा व कार्याचा महामेरू

आमच्यासारख्या नातलगांना किंबहुना सर्व गावाकरिता व समाजाकरिता मार्गदर्शक होत आहे व राहील अशी आमची खात्री आहे. आमचे दाजींमध्ये दिव्यत्वाचा अंश होता म्हणूनच म्हणावेसे वाटते कि, दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती. तुकाराम महाराजांनी यतार्थ म्हटले आहे की, ''नाशवंत देह जाणारे सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ।।'' म्हणजेच मानवी देह हा नाशवंत असून क्षणोक्षणाने तो काळाच्या स्वाधीन होतो, आयुष्यातील सर्व सुखे, वेदना हे कोणालाच चुकत नाहीत आयुष्याचा शेवट हा एकदिवशी सर्वांचाच मृत्यूने होणार आहे हे निश्चित आहे. म्हणून आमचे दाजींसारखे चांगले वागणे व सत्कर्म करणे हे सर्वांनी अंगिकारले पाहिजे. आमचे दाजींचा मृत्यू त्यांनी त्यांचे परिपूर्ण व यशस्वी जीवन सर्व अर्थाने पूर्ण केल्यानंतर झाला आहे म्हणून तो आपण सर्वांच्या व समाजाच्या दृष्टीने आनंदोत्सव आहे. असे परिपूर्ण व यशस्वी जीवन जगलेल्या आमच्या दाजींना आमची भावपूर्ण श्रद्धांजली.

**ॲड. विनायक करकंडे**

# झेडपीतील २३४ शिक्षकांच्या बदल्या

## ३ हजार ८०० शिक्षकांचे अर्ज



**नगर : प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेची ऑनलाइन सुरू झालेली प्राथमिक शिक्षकांच्या बदलीची प्रक्रिया नुकतीच पार पडली. यात जिल्ह्यातील २३४ शिक्षकांच्या बदल्या झाल्या असून संवर्ग १ मध्ये १०७, पती-पत्नी एकत्रिकरणात ४३, अवघड क्षेत्रातून १४, ज्येष्ठता क्रमाने ७० शिक्षकांचा समावेश आहे.**

शिक्षक संघटनाच्या मागणीची दखल घेत अखेर मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी बदल्याची प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला. यंदा जिल्ह्यात बदलीसाठी ३ हजार ८०० शिक्षकांनी अर्ज केले होते. मात्र, यात २३४ शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या. यंदाची बदलीची प्रक्रिया एकाच वेळी आणि पारदर्शक पार पडली. बदली प्रक्रियेमुळे बदली पात्र शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.

# फक्त जलपुजनच नव्हे तर हा वडगाव सावताळ येथील ग्रामस्थांच्या विश्वासपुर्तीचा सोहळा - विश्वनाथ कोरडे



**पारनेर : प्रतिनिधी**

पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथील ग्रामस्थांनी माझ्या नेतृत्ववावर विश्वास ठेऊन फकिरभाऊ नाल्यातून वाहुन जाणारे अतिरिक्त पाणी जवळ जवळ१२० मीटर लांब पाईप मधून ६५० गट नंबर मध्ये असलेल्या गचकी तलावात सोडल्यास गावातील शेकडो हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असल्याचे निदर्शनास आणुन देत संबंधित काम पूर्ण करण्याची मागणी केल्यानंतर महाराष्ट्र राज्याचे महसुल तथा अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.राधाकृष्ण विखे पाटील, तत्कालीन खासदार डॉ सुजय विखे पाटील यांच्या सहकार्याने संबंधित काम नदिजोड प्रकल्पाच्या धर्तीवर पुर्णत्वास नेण्यात यश आले असून सदरच्या नदीजोड प्रकल्पामुळे सातत्याने कोरडा राहणाऱ्या तलावाच्या आज पुर्ण क्षमतेने भभरलेला असताना होत असलेले जलपुजन हा तर वडगाव सावताळ येथील ग्रामस्थांनी माझ्यावर निसंदेहपणे टाकलेल्या विश्वासपुर्तीचा सोहळाच असल्याचे मत भाजपाच्या प्रदेश कार्यकारिणीचे विद्यमान सदस्य श्री विश्वनाथ दादा कोरडे यांनी व्यक्त केले आहे.

संबंधित जलपुजन समारंभावेळी प्रमुख उपस्थित जिल्हा परिषद अहिल्यानगर बांधकाम विभागाचे सभापती श्री काशिनाथ दाते, पारनेर खरेदी विक्री संघाचे चेअरमन अँड. बाबासाहेब खिलारी तसेच स्थानिक उपस्थितीत धनंजय शिंदे ,बाबासाहेब दाते, सुनील शिंदे, उमेश रोकडे, रामदास शिंदे, भाऊसाहेब शिंदे, सुखदेव भनगडे, बाबाजी शिंदे, किसन शिंदे, मच्छीन्द्र शिंदे, पांडुरंग शिंदे, रामचंद्र रोकडे, बाळासाहेब रोकडे, संजय भनगडे, बाळासाहेब धोंडिबा शिंदे ,अशोक शिंदे आणि युवा वर्ग संकल्प शिंदे, कुणाल शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे, अजय रोकडे, दीपक रोकडे आणि महिला वर्ग माजी सरपंच छायाताई शिंदे यांसह इतरही स्थानिक ग्रामस्थ व महिला भगिणीही मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

पारनेर तालुक्यातील विविध गावांत श्री विश्वनाथ दादा कोरडे यांच्या माध्यमातून झालेल्या विविध जलसंधारणाच्या कामामुळे पाणीदार माणुस म्हणून निर्माण झालेली ओळख कोरडे यांनी या प्रकल्पाच्या पुर्णत्वातुन सार्थ ठरवली असल्याचे मत स्थानिक स्थानिक नागरीक व्यक्त करत असुन विश्वनाथ कोरडे म्हणजे जनसामान्यांशी आपल्या कामातून थेट ओळख निर्माण करणारे नेतृत्व असुन उद्याच्या काळात राजकीय कर्तुत्व सिद्ध करण्याची संधी मिळाल्यास वडगाव सावताळ गावचे ग्रामस्थ एकसंघपणे त्यांच्या पाठीशी उभे राहणार असल्याचा आशावादही ग्रामस्थांनी यावेळी व्यक्त केला.

वाचकांच्या लेखणीतून

# जिद्दीला सलाम!

आंबळेगाव, ता. शिरूर येथील दिशा बेंद्रे हिची पोलिस दलात निवड ही सतीश डोंगरे यांनी लिहिलेली आनंददायक बातमी वाचली (पारनेर दर्शन, १४ सप्टेंबर, शनिवार).



रातें हैं उदास दिन कड़े हैं।
ऐ दिल तेरे हौसले बड़े हैं।।

घरची गरिबीची परिस्थिती असताना खस्ता खाऊन, कसरत व सराव करीत जिद्दीने पोलिस दलाची परीक्षा देऊन दिशा बेंद्रे ही तरुणी यशस्वी झाली. तिच्या जिद्दीला आपण सलाम केला पाहिजे. पोलिस दलात अधिकारी बनण्याचे तिचे स्वप्न आहे. ते नक्कीच सफल होईल. त्यासाठी तिचे अभिनंदन करू आणि तिला शुभेच्छा देऊया. तिने होतकरू तरुणतरुणींना एक दिशा दाखविलेली आहे. पोलिस क्षेत्राची आवड आणि निवड असेल त्यांनी तिच्या उज्ज्वल यशापासून धडा घ्यावा.

स्वतः मोलमजुरी करून दिशाला भक्कम पाठिंबा देणाऱ्या तिच्या आईचेही अभिनंदन करूया. तसेच शिरूरच्या श्लोक अकॅडमीतून दिशाने पोलिस भरतीचे प्रशिक्षण घेतले होते. त्यामुळे श्लोक अकॅडमीचे प्रमुख अविनाश कारंडे हेही अभिनंदनास पात्र आहेत.






# दररोज ४० महिलांना आरतीचा मान

## नगरसेविका सुरेखा भालेकर यांचा उपक्रम



■ गणेशोत्सवानिमित्त राणीताई लंके यांनी सुरेखा भालेकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

### समईची भेट

**समाजसेवेची दिपज्योत सतत तेवत राहावी यासाठी आरतीसाठी येणाऱ्या प्रत्येक महिलेस समाजसेवेचे प्रतिक म्हणून समई भेट देऊन सन्मान करण्यात आला.**

**सुरेखाताई भालेकर यांनी पारनेर नगरपंचायतमध्ये आतापर्यंत तिनदा सभापतीपद भुषविले असून या पदाच्या माध्यमातून त्यांनी प्रत्येक वेळी जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. शहरातील महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच त्यांच्या आरोग्याचे तसेच समस्या सोडविण्यासाठीही त्यांनी हिरीरीने पुढाकार घेतला आहे.**

**राणीताई लंके**
**मा. सदस्या, जिल्हा परिषद, नगर**

पारनेर : प्रतिनिधी

**गणेशोत्सवानिमित्त करण्यात आलेल्या गणपतीच्या प्राणप्रतिष्ठापनेनिमित्त दहा दिवस दररोज ४० महिलांना निमंत्रीत करून त्यांना आरतीचा मान देण्याचा अनोखा उपक्रम शहराच्या मा. उपनगराध्यक्षा तथा विद्यामान नगरसेविका सुरेखा भालेकर यांनी राबविला.**

आपल्या या प्रेमाच्या संकल्पनेबाबत बोलताना भालेकर म्हणाल्या, गणेशोत्सवाच्या काळात गणेशाची पुजा, महापुजा करण्याचे काम घरातील महिला करतात. अनेक गणेश मंडळांमध्ये महिलांना आरतीचा मान मात्र मिळत नाही. महिलांना हा मान मिळावा या हेतून आपण दररोज ४० महिलांना आपल्या घरी आमंत्रीत करून त्यांना आरतीचा मान दिला. शहरामध्ये सामाजिक भावनेतून काम करणा-या महिलांना आमंत्रीत करून त्यांचा सन्मानही यावेळी करण्यात आल्याचे भालेकर म्हणाल्या.

भालेकर यांनी पुढे सांगितले की, महिला व बालकल्याण समितीचे सभापतीपद दुसऱ्यांदा भुषवित असताना शहरातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येणार आहेत. जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणीताई लंके यांच्या मार्गदर्शनाखाली स्तन कॅन्सर तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून दि. २५ सप्टेंबर रोजी पारनेर शहरात सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत हे शिबिर संपन्न होणार आहे. या शिबिरात जास्तीत जास्त महिलांनी सहभागी होण्याचे आवाहन भालेकर यांनी केले.

# सभासदांना मिळणार १२ टक्के लाभांश

## बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचा निर्णय । २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत । लाभांश रक्कम ६१ लाख रुपये । चेअरमन वसंत कवाद यांची माहिती

निघोज : प्रतिनिधी

**बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्था सभासदांना ६१ लाख रुपये म्हणजे १२ टक्के लाभांश वाटप करणार असल्याची माहिती चेअरमन वसंत कवाद यांनी दिली आहे. पतसंस्थेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा कवाद यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.**

संस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद , उपाध्यक्ष नामदेवराव थोरात, कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वे सर्वा शांताराम लंके तसेच संचालक मंडळ यांच्या हस्ते दिपप्रज्वलन, लक्ष्मी व सरस्वती देवी तसेच संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद यांच्या प्रतिमेचे पूजन करीत अभिवादन यावेळी करण्यात आले.संस्थेची माहिती देताना चेअरमन कवाद यांनी सांगितले की ,भागभांडवल ६ कोटी ३१ लाख,निधी ३३ कोटी ५९ लाख ,गुंतवणूक - १४५ कोटी ८८ लाख,ठेवी २५३ कोटी ८८ लाख कर्जवाटप १५६ कोटी २० लाख, एकुण व्यवसाय ४१० कोटी ३६ लाख तसेच नफा चार कोटी ७२ लाख रुपये असा आहे.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद व त्यांच्या सहकाऱ्यांनी गेली २७ वर्षांपूर्वी सहकारातील हा वटवृक्ष मोठा करण्यासाठी मुलासारखे संस्थेला जपले आहे. संस्थेची आर्थिक स्थीती अत्यंत मजबूत असून ८४. २० टक्के रक्कम सेफ आहे. जेणेकरून ठेवीदाराने दहा लाख रुपयांची ठेव ठेवल्यास त्या ठेवीदाराने लगेच म्हणजे मुदतीपूर्वी ती रक्कम मागीतल्यास आपण साडेआठ लाख रुपये परत करू शकतो हीच विश्वासाहर्ता ग्राह्य धरुण ठेवीदार मोठ्या संख्येने ठेवी देत असून कर्जाची वसुली अपेक्षेप्रमाणे जास्त असून संस्थेची गुंतवणूक सुद्धा विक्रमी असल्याची माहिती चेअरमन कवाद सर यांनी दिली आहे. यावेळी चेअरमन वसंत कवाद सर, उपाध्यक्ष नामदेवराव थोरात, संचालक मंडळ चंद्रकांत लामखडे, अॅड. बाळासाहेब लामखडे, दामूशेठ लंके, बाबाजी कळसकर, बाळशिराम डेरे, अभिजित मासळकर, भिवाशेठ रसाळ, सतिष साळवे, दिलीप सोदक, शांताराम कळसकर, अॅड. सुनिल मेसे, संचालिका लताबाई कवाद, वैशाली कवाद आदी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय लंके तसेच अधिकारी व कर्मचारी तसेच मान्यवर, सभासद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे माजी चेअरमन रामदासशेठ वरखडे यांनी सर्व विषय मंजूर करण्याची सुचना केली सभासदांनी टाळ्यांच्या गजरात ही सुचना मंजूर केली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय लंके यांनी विषय पत्रीकेचे वाचन केले. यावेळी सोमनाथ वरखडे, सोपानराव भाकरे, रूपेश ढवण, रामचंद्र सुपेकर, भास्कर कवाद यांनी संस्थेच्या कामकाजाचे कौतुक केले. संस्थेचे संचालक अॅड. बाळासाहेब लामखडे व शांताराम कळसकर यांनी या वार्षिक सर्वसाधारण सभेचे सुत्रसंचलन केले. शेवटी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय लंके यांनी आभार मानले. सभा यशस्वी होण्यासाठी संस्थेचे अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



■ बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली यावेळी दिपप्रज्वलन करताना संस्था पदाधिकारी व मान्यवर व संचालक मंडळ.

**संस्थेच्या ठेवी दिवसेंदिवस वाढत असून पतसंस्थेने अतिशय कार्यक्षम व पारदर्शक कारभार करुण ग्रामीण भागातील बँकानाही मागे टाकले आहे. एखादी बँक सुद्धा बारा टक्के लाभांश देत नाही तेवढा लाभांश पतसंस्थेने दिला आहे. स्वमालकीच्या जागा गुंतवणूक ही बाब गौरवास्पद असून नफा मिळवण्यासाठी नव्हे तर सभासदांच्या लाभाच्या योजना सुरू करुण समाजसेवा करीत पतसंस्था सेवाभाव करीत आहे. ऑडिट रिपोर्ट येऊन पाहा हा बोर्ड जगजाहीरपणे लावीत संस्था कार्यक्षमपणे कारभार करीत आहे हे दाखवून दिले आहे. रुग्णांना बेड उपलब्ध करीत रुग्णसेवा हीच खरी ईश्वर सेवा असल्याचे संस्थेने कृतीतून दाखवून दिले आहे.**

**उपस्थित सभासदांची प्रतिक्रिया**

## पारनेर महाविद्यालयात हिंदी दिवस साजरा

### पोस्टर प्रदर्शन व भित्तीचित्र स्पर्धा




पारनेर : प्रतिनिधी

**येथे न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज पारनेर येथे १४ सप्टेंबर रोजी हिंदी दिवसाचे औचित्य साधून विविध कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी पोस्टर प्रदर्शन व भितीपत्रक स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच विद्यार्थ्यांचे हस्तलिखित साहित्य सौरभ या अंकाचे प्रकाशन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांच्या हस्ते करण्यात आले.**

हिंदी ही राजभाषा असून ती जगाच्या विविध देशांमध्ये बोलली जाते तिचा व्यवहारामध्ये वापर केला जातो. आपणही हिंदीला सन्मान दिला पाहिजे असे मत यावेळी प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या पोस्टर व भित्तिपत्रकाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. हरेश शेळके व डॉ.नंदकुमार उदार यांनी परीक्षण केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उत्कृष्ट पोस्टर बनविर्णाय़ा कु. तनुजा सोबले प्रथम तीन क्रमांक नम्रता साळवे द्वितीय क्रमांक व कु. अजय केदार या विद्यार्थ्यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक वितरण करण्यात आले.

याप्रसंगी हिंदी विभागप्रमुख डॉ. विजयकुमार राऊत,डॉ. हनुमंत गायकवाड, प्रा. शुभदा आर्डे प्रा. प्रतीक्षा तनपुरे महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे , अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. रवींद्र देशमुख, कला शाखाप्रमुख डॉ. रघुनाथ नजर, वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. युवराज वाघिरे, डॉ. दीपक सोनटक्के, प्रा. नितीन निपुंगे, प्रा. शामराव रोकडे आदी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंजोबा तरुण मंडळाच्या वतीने गणेशोत्सव विविध उपक्रम

### आकर्षक सजावट व विद्युत रोषणाई

वडगाव सावताळ : प्रतिनिधी

**वडगाव सावताळ येथे गणेश उत्सवानिमित्ताने विविध कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होत आहेत. गावातील मुंजोबा तरुण मित्र मंडळ दरवर्षीप्रमाणे सार्वजनिक गणेश उत्सव साजरा करत आहे. या मित्र मंडळाच्या माध्यमातून गावात विविध धार्मिक सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात येत आहे.**

उत्सव काळामध्ये मित्र मंडळाच्या वतीने परिसरामध्ये आकर्षक सजावट व लाईट डेकोरेशन करण्यात आले आहे. त्यामुळे परिसरात गणपती उत्सव हा आकर्षण बनला आहे. अनेक गणेश भक्त येथे दर्शनासाठी येत आहेत. गणेश स्थापनेच्या दिवशी गावचे सरपंच संजय रोकडे व अध्यक्ष प्रमोद गायकवाड यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी गणेश मित्र मंडळाला व आरतीला गावचे माजी सरपंच राजेंद्र रोकडे, उद्योजक अशोक खराबी, मोहनराव रोकडे, इंजि. निखिल दाते, माऊली ठुबे, सर्जे राव रोकडे, प्रसिद्ध गाडामालक तुकाराम झावरे, उद्योजक भगवान वाळुंज, मंगेश खामकर, विपो फाउंडेशनचे अध्यक्ष मनोजभैय्या झावरे, निलेश शिंदे, संदीप व्यवहारे आदी प्रमुख उपस्थित राहिले.

यावेळी मुंजोबा मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रमोद गायकवाड, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अनिल गायकवाड, उद्योजक सतीश गायकवाड, बाळासाहेब नरवडे भागवत गायकवाड बाबाजी गायकवाड शुभम आंधळे संतोष आंधळे संजय केदारी स्वप्निल गायकवाड दादाभाऊ गायकवाड किरण गायकवाड शरद कुंभार संजय केदारी संतोष खोसे प्रतीक लोळगे आदेश साळवे राजेंद्र क्षीरसागर भरत शिर्के पवन शिर्के देवानंद क्षीरसागर वामन रोकडे वेदांत ठुबे रोशन भोसले प्रशांत आंबेकर शिवराम ठुबे ग्रामपंचायत सदस्या सीमाताई गायकवाड, वंदना गायकवाड, ऋतुजा गायकवाड, दिपाली जांभळकर, मनीषा कुंभार, लताबाई आंधळे, आदी विविध कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतात.



### विविध धार्मिक कार्यक्रम

**वडगाव सावताळ येथे मुंजोबा तरुण मित्र मंडळाच्या माध्यमातून नियमित दरवर्षी विविध धार्मिक सामाजिक सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येतात गावातील इतरही सामाजिक उपक्रमांमध्ये मित्र मंडळाचा सहभाग असतो. गणेश उत्सव काळात मंडळाच्या वतीने भेदिक भजन प्रवचन महिलांसाठी व लहान मुलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन करत असतो. गणेशोत्सव काळात दररोज महाप्रसाद असतो अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष प्रमोद गायकवाड व अनिल गायकवाड यांनी दिली.**

# हजारो भाविकांनी घेतला आण्याच्या आमटीचा लाभ!

## संदीप पाटील वराळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा उपक्रम । ग्रामस्थांनी केले कौतुक

निघोज : प्रतिनिधी

**संदीप पाटील वराळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने गणेश मंडळाच्या स्थापनेच्या पहिल्याच वर्षी महाप्रसाद माध्यमातून जुन्नर तालुक्यातील आणे येथील प्रसिद्ध आमटीचा महाप्रसाद देऊन ग्रामवासीयांना खूश केले असून ग्रामस्थ व भाविकांनी मंडळाचे व संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले आहे.**



जुन्नर तालुक्यातील आणे येथील प्रसिद्ध आमटी मुंबईपासून ते नगर व पुणे जिल्ह्यातील जनतेला आवडती आहे. तोच मेनू महाप्रसादाच्या निमित्ताने निघोजकरांना मिळाला आहे. रात्री आठ ते दहा या वेळेत हजारो भाविकांनी घरुन भाकरी आणत या आमटीचा लाभ घेतला आहे.

संदीप पाटील वराळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पहिले वर्ष असले तरी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशन माध्यमातून अध्यक्ष सचिन पाटील वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी गेली आठ वर्षात सामाजिक व विकासाभिमुख उपक्रम राबवीत समाजाभिमुख काम करीत सर्वसामान्य जनतेला मोठ्या प्रमाणात आधार देण्याचे काम केले आहे.

माजी सरपंच व बाजार समितीचे माजी उपसभापती संदीप पाटील वराळ यांनी गेली सोळा वर्षांपूर्वी समाजात कार्यरत राहताना गणेशोत्सव मंडळाच्या माध्यमातून समाजाभिमुख उपक्रम राबवित सेवाभाव केला आहे. तेच संघटन व तोच सेवाभाव त्यांच्या कामी येत त्यानंतरची आठ वर्षात त्यांनी पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत व बाजार समिती यामाध्यमातून राजकारणाचा पाया भक्कम करीत त्यांनी पारनेर तालुक्यात नावलौकिक मिळवीत राजकीय प्राबल्य मिळवीले. त्यानंतर गेली आठ वर्षात हीच जबाबदारी सचिन वराळ पाटील यांच्यावर आली.

संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशन माध्यमातून सचिन पाटील वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी सेवाभावी उपक्रम राबवीत विशेष करून गरीबांची दिवाळी या उपक्रमात हजारो गरीबांना विशेष करून महिला भगिनी यांना साडी वाटप करीत मिठाई वाटप करीत ज्येष्ठांचा सन्मान करीत दरवर्षी लोकसहभागाच्या माध्यमातून पाच ते सहा लाख रुपयांचा सेवाभावी उपक्रम राबवीत असतात. संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशन कार्यालयाच्या माध्यमातून अनाथ महिलांना शासकीय योजनांचा पाठपुरावा करीत तसेच पंतप्रधान किसान योजना, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, ज्येष्ठ नागरीकांसाठी वयोश्री योजना, मुख्यमंत्री देवदर्शन योजना, शेतकऱ्यांना विमा योजना लाभ मिळण्यासाठी प्रयत्न अशाप्रकारे शासकीय लाभाच्या योजना जनतेला मिळण्यासाठी अखंड कार्यरत राहण्याचे काम संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी आजपर्यंत केले असून जवळपास आठ वर्षात जिल्हा परिषद गटातील हजारो लोकांना व भगिनींना या शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे. अशाप्रकारे सचिन पाटील वराळ व त्यांच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात सामाजिक कामे करीत जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत माध्यमातून राजकीय प्राबल्य निर्माण करीत गेली आठ वर्षात कोट्यावधी रूपयांची विकासकामे करीत तालुक्यात नावलौकिक मिळविला आहे. संदीप पाटील वराळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या माध्यमातून गेली सात दिवसात स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम ठेवीत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम केले आहे.

संदीप पाटील वराळ सार्वजनिक गणेशोत्सव आरती यावेळी पारनेरचे पोलिस निरीक्षक समीर बारवकर व त्यांच्या सहकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आली यावेळी या मान्यवरांचा सत्कार संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला.

# संजय दरेकर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

## खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते सन्मान



सुपा : प्रतिनिधी

**शिक्षक दिनाचे औचित्य साधत पुणे महापालिकेच्या वतीने शिक्षक संजय दरेकर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

राधाकृष्णन यांनी शिक्षकांच्या समाजातील अमूल्य योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दृष्टीने ५ सप्टेंबर म्हणजेच त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून देशात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. याच शिक्षक दिनाचे औचित्य साधून पुणे महानगरपालिकेच्या वतीने दरेकर यांना आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

यामध्ये प्रामुख्याने विशेष कार्य करणाऱ्या गुणवंत शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. या पुरस्कारासाठी निवड करताना काही अटी व शर्ती ठेवलेल्या असतात आणि याच माध्यमातून आदर्श शिक्षक निवडले जातात. यावर्षी सुद्धा पुणे महानगरपालिकेने असाच उपक्रम राबविला. यामध्ये एकूण पंधरा शिक्षकांची निवड करण्यात आली. या १५ शिक्षकांना शाल, श्रीफळ, प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि एक टॅब देऊन सन्मानित करण्यात आले. यावर्षी या आदर्श शिक्षकाचे मानकरी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, ईऑन ग्यानंकुर शाळेतील शिक्षक संजय आबासाहेब दरेकर ठरले आहेत.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे, त्यांना विविध स्पर्धा परीक्षांना बसविणे, स्कॉलरशिप परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची तयारी करणे त्यांना गुणवत्ता यादीत आणणे असे बहुमोल कार्य संजय दरेकर गेल्या १२ वर्षापासून करत आहेत. एक आदर्श, गुणवंत आणि अष्टपैलू शिक्षक म्हणून त्यांची ओळख आहे. सध्या ते पुणे जिल्हा शिक्षण मंडळ मध्ये कार्यरत आहेत.

शिक्षण विभाग पुणे महानगरपालिकेच्या प्रशासकीय अधिकारी सौ सुनीता वाखारे मॅडम, शिक्षण विभाग पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त आशा राऊत मॅडम, अतिरिक्त महापालिका आयुक्त पुणे महानगरपालिका पृथ्वीराज, प्रशासक तथा आयुक्त पुणे महानगरपालिका डॉ.राजेंद्र भोसले यांच्या हस्ते दरेकर यांना आदर्श पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबद्दल नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते संजय दरेकर यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी सुपा गटाचे नेते वाळवणे गावचे उपसरपंच सचिन आप्पा पठारे, सरपंच गोरक्षनाथ दरेकर, पवार सर, आबासाहेब दरेकर आदी यावेळी उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com